# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
## (पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

दूरध्वनी क्रमांक. :
०२०–२५६२१०४५
०२०–२५६२१०४८
०२०–२५६२१०४९

गणेशखिंड, पुणे ४११००७
अंतर्गत गुणवत्ता सिध्दता कक्ष
iqac@unipune.ac.in


संदर्भ क्र.:– अंगुसिक/ ३१० .

दिनांक – १५/०१/२०२३

## स्मरणपत्र
## अत्यंत महत्वाचे व तातडीचे

प्रति,
मा. प्राचार्य/मा. संचालक,
संबंधित सर्व संलग्न महाविद्यालये, मान्यताप्राप्त परिसंस्था
आणि स्वायत्त महाविद्यालये,
प्रस्तुत विद्यापीठ.

**विषय – अखिल भारतीय उच्चतर शिक्षा सर्वेक्षण कार्यक्रम (A.I.S.H.E.) मध्ये शैक्षणिक वर्ष सन २०२१–२२ ची माहिती डी सी एफ मध्ये भरणे व अपलोड करण्याबाबत.**

संदर्भ – १. मा. शिक्षण संचालक, (उच्च शिक्षण) शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे–०१ यांचे पत्र. उशिसं/सांख्यिकी/एआयएसएचई/२०२२–२३/१३८००,१३८०१ दि. २१ नोव्हेंबर, २०२२.
२. प्रस्तुत विभागाचे जा.क्र. अंगुसिक/२१२ दि. ३०/११/२०२२.

महोदय/महोदया,

प्रतिवर्षाप्रमाणे मानव संसाधन विकास मंत्रालय, नवी दिल्ली यांच्याकडून भारतातील तसेच महाराष्ट्र राज्यातील उच्च शिक्षणाबाबतचे धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी सन २०२१–२२ या शैक्षणिक वर्षाची सांख्यीकी माहितीची अत्यंत आवश्यकता आहे. त्याअनुषंगाने सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न असलेल्या पुणे,अहमदनगर, नाशिक जिल्हयामधील व दादरा नगर हवेली या केंद्र शासित प्रदेशातील अनुदानित, विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित महाविद्यालय व परिसंस्थाकडून **A.I.S.H.E. पोर्टलव्दारे माहिती २१/११/२०२२ पासून मागविण्यात येत आहे.**

सन २०२१–२२ मध्ये /पूर्वी ज्या महाविद्यालयांना/परिसंस्थांना राज्य सरकारकडून मान्यता व विद्यापीठातील शैक्षणिक विभागाकडून संलग्नीकरण मिळालेले आहे. अशा सर्व महाविद्यालयांनी/परिसंस्थांनी अखिल भारतीय उच्चतर शिक्षा सर्वेक्षण कार्यक्रम A.I.S.H.E. वर नोंदणी करून माहिती भरणे बंधनकारक आहे. जर संबधित महाविद्यालयांनी/परिसंस्थांनी सदर वेबपोर्टलवर नोंदणी केली नाही तर भविष्यात होणाऱ्या नुकसानीस संबधीत महाविद्यालय/परिसंस्थेचे मा. प्राचार्य/मा. संचालक व नोडल अधिकारी जबाबदार असतील याची कृपया गांभिर्यपूर्वक नोंद घ्यावी. सन २०२१–२२ पूर्वी ज्या महाविद्यालयांनी/परिसंस्थांनी अखिल भारतीय उच्चतर शिक्षा सर्वेक्षण कार्यक्रम A.I.S.H.E. च्या वेबपोर्टलवर अध्यापही नोंदणी केलेली नाही, अशा महाविद्यालय व परिसंस्थांनी सदर वेबपोर्टलवर अद्यापपर्यंत नोंदणी का केलेली नाही याचा खुलासा मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे यांच्याकडे त्वरीत सादर करावा आणि त्याची प्रत विद्यापीठातील अंतर्गत गुणवत्ता सिध्दता कक्षाकडे सादर करून तातडीने सदर वेबपोर्टलवर नोंदणी करावी.

तसेच सन २०२१—२२ मध्ये ज्या महाविद्यालयांना/परिसंस्थांना नव्याने मान्यता मिळालेली आहे, अशा महाविद्यालयांनी/परिसंस्थांनी अखिल भारतीय उच्चतर शिक्षा सर्वेक्षण कार्यक्रमाअंतर्गत संबधीत वेबपोर्टलवर महाविद्यालयांचे/परिसंस्थांचे नाव समाविष्ट करण्यासाठी नोडल अधिकाऱ्याचे नाव, मोबाईल नंबर, महाविद्यालयांचे/परिसंस्थांचे नोंदणी केलेले ई—मेल आयडी, शासन निर्णय व संलग्नीकरणाचे पत्र (Affilitation Letter) ई. माहिती पोर्टलवर अपलोड करून नोंदणी करावी. तसेच पुढील मान्यतेकरिता (Registration Approval) संबधित महाविद्यालय/परिसंस्थाच्या नोडल अधिकाऱ्यांनी मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे यांच्या कार्यालयाकडे वरील कागदपत्रांसह व्यक्तिशः उपस्थित राहून मान्यता घेणे गरजेचे आहे.

संबधीत महाविद्यालयांनी व परिसंस्थांनी अखिल भारतीय उच्चतर शिक्षा सर्वेक्षण कार्यक्रम A.I.S.H.E. मध्ये शैक्षणिक वर्ष सन २०२१—२२ मधील DCF ची माहिती पुर्णपणे भरल्यानंतर सदर महाविद्यालय व परिसंस्थांनी ऑनलाईन पध्दतीने अर्ज करून विहीत मुदतील ना—हरकत प्रमाणपत्र प्राप्त करून घेणे बंधणकारक आहे याची महाविद्यालयांच्या/परिसंस्थांच्या मा. प्राचार्य/संचालक व मा. नोडल अधिकाऱ्यांनी नोंद घ्यावी.

**त्याची प्रक्रिया खालीलप्रमाणे—**

www.unipune.ac.in→BOD Online→Login→for College Users→College Login ID→ Password→NOC Details→Fill A.I.S.H.E. Info→Select Academic year (2021-2022)→ Select Nodel/OfficerPrincipal's Name→Write AISHE Code→Submit→Print NOC Format on College Letterhead 1. Upload NoC format with Principal/Director's Sign & Stamp 2. Upload AISHE Certificate→Submit

सदरील माहिती शासनास अत्यावश्यक असून महाविद्यालयांनी व परिसंस्थांनी **दि. २० जानेवारी, २०२३** पर्यंत पूर्ण माहिती भरणे बंधनकारक असून लवकरात लवकर पूर्ण करून सहकार्य करावे. या संदर्भात काही अडचणी आल्यास महाविद्यालयांनी/परिसंस्थांनी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील अंतर्गत गुणवत्ता सिध्दता कक्ष, ०२०—२५६२१०४८/४९ यांच्याशी संपर्क साधावा.

आपला,

(श्री. श्रीकांत गायकवाड)
सहायक कुलसचिव,

**प्रत माहितीसाठी —**

१. मा. कुलसचिव, प्रस्तुत विद्यापीठ
२. कार्यकारी सहायक, मा. प्र—कुलगुरू कार्यालय,
३. स्वीय सहाय्यक, मा. कुलगुरू कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.